सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No.1135 /पोउआ/ प्रकटीकरण / 2024 दिनांक/ Date : 27/08/2024

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month JUNE – 2024 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month JUNE – 2024 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे जुन –२०२४ करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी) ''** याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे जुन – २०२४ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

**१) शिवडी पोलीस ठाणे बंदर परिमंडळ, मुबई गु.र.क्र.१३६/२०२४ कलम ३०२, ५०४,५०६(२), २०१, ३४,भादवि सह १३५, ३७(२),महाराष्ट्र पोलीस कायदा.**

**२) पश्चिम सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, बी.के.सी.,मुंबई. गु.र.क्र.०७/२४ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० (ब) भा.दं.वि. सह कलम ६६क, ६६ड, आय.टी. ॲक्ट, २०००**

**ब) माहे जुन– २०२४ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

**१) साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई. परिमंडळ–१०, गु.र.क्र.३६/२०१६,क.३०२,४५२ भा.दं.वि.सं.,**

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :–**

दिनांक—२१/०८/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ”** माहे जुन —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे .

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुन —२०२४

| | | |
|---|---|---|
| **०१** | **शिवडी पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई** | **गु.र.क्र. १३६/२०२४ कलम ३०२, ५०४,५०६(२), २०१, ३४,भादवि सह १३५, ३७(२),मपोका** |

### —: “ पूर्व वैमनस्यातून खुन ”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :—नमुद गुन्हयात दि.०१/०६/२०२४ रोजी १३.०० वा. चे सुमारास शकीलच्या गॅरेजजवळ रस्त्याच्या कडेला ब्रिकबंदर, शिवडी, मुंबई या ठिकाणी काही अज्ञात इसमांनी गुन्हयातील फिर्यादी शेख उस्मान शेख अहमद उर्फ शकिल, वय— ६० वर्षे यांच्या परिचयाच्या मोहम्मद नुरहसन अब्दुल गफार शेख उर्फ हसन कान्या, वय अंदाजे ५० वर्षे यास अज्ञात कारणावरून धारदार शस्त्राने त्याच्या हातावर, पायावर व पोटावर वार करून त्यास जिवे ठार मारले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | शेख उस्मान शेख अहमद उर्फ शकिल, वय— ६० वर्षे |
| **बळीत** | :— | मोहम्मद नुरहसन अब्दुल गफार शेख उर्फ हसन कान्या, वय ५० वर्षे |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) अनिकेत अशोक तेलगु वय २१ वर्षे<br>२) राहुल प्रेमकुमार कोयरी वय २१ वर्षे<br>३) मोहम्मद हनिफ अल्लाबक्श शेख वय २९ वर्षे<br>**अटक दिनांक ०२/०६/२०२४** |

**तपास कौशल्य :—** नमुद गुन्ह्यातील मा.पोलीस उप आयुक्त,बंदर परिमंडळ, मुंबई यांनी नमूद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने महत्वाच्या सुचना दिल्या. नमूद गुन्हयाच्या घटनास्थळी पोलीस पथक जाऊन चौकशी केली असता, मयत इसमास कोणी मारले याबाबत काहीही उपयुक्त माहिती मिळून येत नव्हती.

सदर परिसरात आजूबाजूचे तसेच येण्या—जाण्याच्या मार्गावरील ७० सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी केली तसेच गुप्त बातमीदार यांच्याकडे चौकशी केली असता, सदर गुन्हा हा हानिफ व त्यांच्या साथीदारांनी केल्याचे निष्पन्न झाले.

सदर गुन्हयाच्या तपासकामी वरिष्ठांच्या आदेशाने चार पथक तयार करण्यात आले. सदर गुन्हयातील संशयित इसम हा वडाळा परिसरात लपून असल्याची गुप्त माहिती प्राप्त होताच, स.पो.नि. खुळे, स.पो.नि. कुंभार व गुन्हे प्रकटीकरण व पथकाने आरोपी पळून जाण्याच्या बेतात असताना त्यास शिताफीने ताब्यात घेतले व आरोपीत इसमास अटक करण्यात यश प्राप्त केले आहे.

**शिवडी पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री.विजय धोंडिराम भिसे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | श्री. रोहीत चंद्रकांत खोत, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक, | श्री.विशाल एकनाथ चंदनशिवे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक, | श्री.अनिल अशोक देवळे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक, | श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक, | श्री.स्नेहलसिंग रमेश खुळे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक, | श्री.अमित शिवाजी कुंभार | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | परि.पोलीस उप निरीक्षक | श्री.दादासाहेब सोमनाथ शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.०६०११०६ | आशादुल्ला नजाम उदद्दीन बागवान | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र. १११६६१ | विश्वास जोरसिंग जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र.१११६२७ | संतोष रामभाऊ आठरे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र.१४०५८५ | दिपक तुकाराम माळोदे | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र. १४०५४३ | अमोल एकनाथ लाड, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र.१४१०४३ | अमित मारूती मोहिते | प्रशस्तीपत्रक |

# (अ) २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुन –२०२४

<table>
<tr><td>०१</td><td>पश्चिम सायबर पोलीस ठाणे,<br>गुन्हे शाखा, मुंबई</td><td>गु.र.क्र. ०७/२४ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० (ब) भा.दं.वि. सह कलम ६६क, ६६ड, आय.टी.ॲक्ट, २०००</td></tr>
<tr><td colspan="3">

**–: " बनावट वेबसाईटचा आधारे आर्थिक फसवणूक '':–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :–नमुद गुन्हयात दिनांक ३१/१०/२०२३ ते ०८/११/२०२३ रोजी दरम्यान https://eadcosmos-com/ या बनावट वेबसाईटचा धारक Nisha Eadcoms (+1 (940) 288-6077) या व्हॉटसअॅप अकाऊंटची धारक व Alisha Jaiswal ( @Jazzalisha), Saorabh Nigam (@SaurabhnigM ), Risk Control (GAURAV SINHA) ( @Riskcontroldepartment ) या टेलिग्राम अकाऊंट धारकांनी मिळून फिर्यादीची आर्थिक फसवणुक करण्याचा कट करुन फिर्यादीला वेगवेगळे टास्क पुर्ण करायला लावायच्या बहाण्याने त्यावर भरघोस नफा देण्याचे अमिष देवून प्रत्येक टास्क करतेवेळी वेगवेगळी कारणे देवून वेगवेगळ्या बॅक खात्यांमध्ये रु.४३,६२,७३१/– एवढी रक्कम गुंतविण्यास सांगितले व टास्क पुर्ण केल्यानंतरदेखिल फिर्यादीने गुंतविलेली मुळ रक्कम तसेच त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावर मिळणारा नफा यापैकी कोणतीही रक्कम फिर्यादीला न देता फिर्यादीची एकूण रु.४३,६२,७३१/–इतक्या रक्कमेची आर्थिक फसवणुक केली म्हणुन गुन्हा नोंद

</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | मोझेस विन्सेंट कार्डोंज, वय ७३ वर्षे |
| **चेरीस गेलेली मालमत्ता** | :– | एकुण ४३,६२,७३१/– रूपये |
| **हस्तगत मालमत्ता** | :– | मोबाईल फोन – ११; बॅक पासबुक – ४७; बॅक चेकबुक – २३; बॅक ए.टी.एम कार्ड – १०४; सिमकार्ड – १०; बॅक मॅनेजर स्टॅम्प – ०१ |
| **आरोपी अटक व दिनांक** | :– | १) प्रमोदकुमार रविंद्र बेहेरा वय २६ वर्षे,<br>२) राकेशकुमार हरिराम चौधरी वय २५ वर्षे,<br>३) सूवेंदू निरंकर दास वय ३० वर्षे,<br>४) जयदिप अमरकुमार परिदा वय २४ वर्षे,<br>५) मनोजकुमार अदिचरम राऊत वय २९ वर्षे,<br>अटक दिनांक ३०/०६/२०२४ |

| | |
|---|---|
| मोबाईल फोन | ११ |
| बॅक पासबुक | ४७ |
| बॅक चेकबुक | २३ |
| बॅक ए.टी.एम कार्ड | १०४ |
| सिमकार्ड | १० |
| बॅक मॅनेजर स्टॅम्प | ०१ |

**तपास कौशल्य :–** नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांची फसवणुक झालेली रक्कम ही Federal Bank Account No- – 20230100088656- Amount- 124760/- Account No-20230100088698, Amount-18,88,428/- Account No- 20230100088847 Amount- 10,00,000/- हया बॅक खात्यामध्ये वळती करण्यात आल्याचे दिसुन आले. नमुद बॅक खात्यास लिंक असलेले मोबाईल क्रमांक हे बंद असल्याने पुढे लिंक मोबाईल क्रमांकाचे पेटीएम, गुगल पे इतर माहिती प्राप्त करून क्लिष्ठ तांत्रिक तपासातुन मोबाईल क्रमांकाची रिचार्ज हिस्ट्री प्राप्त करुन आरोपीतांचे नवीन मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आले. त्यांचे सीडीआर प्राप्त करून तांत्रिक विश्लेषणातुन गुन्हयातील आरोपी हे भद्रक, राज्य ओडीशा, येथे असल्याचे निप्पन्न झाले.

तपासी पथकाने प्रथम गुन्हयातील बॅक खाते हे सायबर गुन्हेगाकरीता पुरविणारा आरोपी सुवेंदु दास यांचेबाबत माहिती प्राप्त करून त्यांचे मोबाईल क्रमांक व पॅनकार्डवरून त्यांचे बॅक खात्याची माहिती प्राप्त करण्यात आले. तसेच सदरचे बॅक खाते हे आरोपी सुवेंदु दास याचे बॅक खात्यामध्ये मोठया प्रमाणात रक्कम ही आरोपी प्रमोद बेहेरा याचे बॅक खात्यामधून

आल्याचे दिसून आल्याने तसेच नमुद आरोपीत हे सतत संपर्कात असल्याने आरोपी प्रमोद बेहेरा याचे मोबाईल क्रमांकावरून व पॅनकार्डवरून त्याचे इतर बॅक खात्याची माहिती प्राप्त करण्यात आली.

तसेच आरोपी प्रमोद बेहेरा याचे Axis Bank Account Number-921010042705579 यावर नमुद गुन्हयातील Federal Bank Account Number 20230100088698 या बॅक खात्यामधून ३,००,०००/— रूपये रक्कम हस्तातरीत झाल्याचे दिसून आले. तसेच वर नमुद लाभार्थी बॅक खात्यामधून काही रक्कम ही ए.टी.एम. मधून भद्रक येथून काढल्याचे बॅक खात्याचे स्टेटमेंमधून दिसत असल्याने नमुद आरोपीत हे भद्रक, ओडीशा येथील असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस पथक हे भद्रक ओडीशा येथे तपासकामी रवाना झाले.

भद्रक टाउन पोलीस ठाणे, भ्रदक, ओडीशा या स्थानिक पोलीस ठाणेचे मदतीने सदरचे बॅक खाते सायबर गुन्हेगारीकरीता पुरविणारा आरोपी सूवेंदू निरंकर दास, वय ३० वर्षे व सदरचे बॅक खात्यास नवीन मोबाईल क्रमांक लिंक करून ते बॅक खाते पुढे पुरविणारा आरोपी प्रमोदकुमार रविंद्र बेहेरा वय २६ वर्षे, यास ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्यांचेकडे केलेल्या तपासात आरोपी प्रमोद बेहेरा हा सदरचे बॅक खाते हे त्याच्या साथीदार आरोपी राकेशकुमार हरिराम चौधरी वय २५ वर्षे, यास देत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून आरोपी राकेशकुमार चौधरी याचेबाबत माहिती प्राप्त करून त्यास तसेच त्याचे इतर साथीदार नामे जयदिप अमरकुमार परिदा वय २४ वर्षे, व मनोजकुमार अदिचरम राउत वय २९ वर्षे यांना ताब्यात घेण्यात आले.

अटक आरोपीतांकडे केलेल्या तपासात एंकदरित आरोपीतांनी सदरचा गुन्हया कश्याप्रकारे केला याची माहिती प्राप्त करण्यात आली. त्याद्वारे गुन्हयातील अटक आरोपी हे भारताबाहेरील आरोपीतांच्या संपर्कात असल्याचे व सायबर गुन्हेगारीकरीता टेलिग्रामद्वारे वेगवेगळया सायबर गुन्हयाकरीता पुरवित असल्याचे दिसून आले आहे.

नमुद गुन्हयातील एकुण ६ अटक आरोपीतांकडून एकूण ११ मोबाईल, ४७ बॅक खात्यांचे पासबुक, २३ चेक बुक्स, १०४ एटीएम कार्ड्स, १० सिम कार्ड्स इत्यादी जप्त करण्यात आले आहेत.जप्त करण्यात आलेल्या बॅक खात्याची एन.सी.सी.आर. पोर्टल वर पडताळणी केली असता संपुर्ण भारतभरातून एकूण ४० ऑनलाईन सायबर तक्रारी नोंद असल्याचे व त्यामध्ये त्यांचा सहभाग असल्याचे उघडकीस आले आहे.

**पश्चिम सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, बी.के.सी.,मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | दत्ताराम विश्वास चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | सविता परशराम माळी—शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | सहा. पोलीस निरीक्षक | पुनम शिवाजी जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | नितीन संभाजी गच्चे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.०६१६३२ | प्रशांत प्रकाश भूवड | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र.०९०८०७ | केशव लक्ष्मण तकीक | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि.क्र.११०३२३ | संग्राम जयवंत जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र.१५१२५९ | अभिजीत नथूराम देसाई | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.०९०८०० | विष्णू अप्पासो काळे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २१/०८/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जुन —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | साकीनाका पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई | गु.र.क्र. ३६/२०१६, कलम ३०२, ४५२ भादविसं |

### —: '' किरकोळ भांडणावरून खुन '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील अटक आरोपी ( फिर्यादी ) हे दिनांक १६/११/२०१६ रोजी दिवसा घरी एकटेच असताना दुपारी साडेचारच्या सुमारास शेजारी श्रीमती. पवनदेवी बिलेट दास, वय ३३ वर्षे यांना एका अनोळखी इसमाने मानेवर चाकुचा वार करून जबर जखमी केले व तो चाकुसह तेथुन उघडया दरवाजातुन पळुन गेला.

त्यानंतर फिर्यादीने पळून गेलेल्या अनोळखी आरोपीचा पाठलाग केला त्यावेळेस त्याने जखमीचे नातेवाईक श्री कैलाश साहु यांना घटनेबाबत सांगीतले. त्यांनतर कैलाश साहु हे घटनेच्या ठिकाणी पोहचले व त्यांनी पोलीसांना देखील कळविले. साकीनाका पोलीस ठाण्याचे अधिकारी /अंमलदार तेथे पोहचले. अर्जदार अटक आरोपी ( फिर्यादी ) ने पोलीसाना घटनास्थळ दाखविले. पोलीसांनी तात्काळ डॉक्टरांना पाचारण केले. डॉक्टरांनी पवनदेवी हिला तपासुन ती मयत झाली असल्याचे सांगीतले. त्यांनतर पोलीसांनी फिर्यादीकडे चौकशी करून सविस्तर जबाब नोंद करून गुन्हा नोंद केला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | शिशिरकुमार गोपाळचंद्र पहाडी, वय ३६ वर्षे |
| बळीत | :— | श्रीमती. पवनदेवी बिलेट दास, वय ३३ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि. २७/०६/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | शिशिरकुमार गोपाळचंद्र पहाडी, वय ३६ वर्षे<br>**आरोपी अटक दिनांक १८/०१/२०१६ रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्यातील आरोपीविरूध्द सबळ पुरावा निपन्न झाल्याने मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश यांनी दिनांक २७/०६/२०२४ रोजी भादवि कलम ३०२ मध्ये **जन्मठेप व रूपये २०,०००/— दंड व** दंड न भरल्यास ६ महिने शस्त्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. तसेच भादवि कलम ४५२ भादवि मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व रूपये ५,००/— दंड व दंड न भरल्यास २ महिने साधी कैद, अशी शिक्षा सुनावली आहे |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने व अटक आरोपीने ( फिर्यादी ) फिर्यादीमध्ये नमुद केलेल्या घटनाक्रमा बाबत विसंगती आढळुन आल्याने तसेच सदर गुन्हयातील साक्षीदार व घटनास्थळाचे नजीकचे सीसीटिव्ही फुटेज लक्षात घेता फिर्यादीने सांगीतलेी घटना व वस्तुस्थिती यामध्ये तफावत असल्याचे आढळुन आले. फिर्यादीने कथन केलेली घटना खोटी असल्याचे व श्रीमती पवन देवी हिचा खुन फिर्यादीने केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने व तशी त्याने कबुली दिल्याने सदर गुन्हयात फिर्यादीस अटक करण्यात आली.

अटक आरोपी शिशीरकुमार गोपालकृष्ण पहाडी यांच्या खोलीत त्याचे समवेत राहणारे तीन रूम पार्टनर श्री संतोष सुरेश गौडा हि./२२ वर्ष , श्री. प्रशांत सुरेश गौडा हिं./२० वर्ष व श्री जगन्नाथ नरेंद्र पाणिग्राही हि./२७ वर्ष यांचे जबाब नोंद केले. तसेच प्रत्यक्ष

साक्षीदार याचें जबाब नोंद केले.

नमुद गुन्हयाच्या सुनावणी च्या वेळी योग्य मार्गदर्शन केले. व न्यायालयीन कोर्ट कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादी व साक्षिदार यांना योग्य मार्गदर्शन करुन साक्ष देण्याकरीता सहाय केले. व समन्स वॉरन्ट अंमलदार यांनी यातील साक्षिदार व पंच तसेच वैदयकिय अधिकारी यांना वेळेत मा. न्यायालयात हजर ठेवले.तसेच पोनि गुन्हे अधिकारी व मदतनिस यांनी मा. न्यायालया ने दिलेल्या तारखेला कोर्टात गुन्हयातील साक्षिदार व मा. कोर्टासमोर सादर करावयाची कागदपत्रे मुददेसुद व वेळेत सादर केली.

**साकीनाका पोलीस ठाणे, परिमंडळ–१०, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.गबाजी शंकर चिमटे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक (सेवानिवृत्त) | श्री. उत्तम रामचंद्र पाचपुते | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | योगेश शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पेलीस निरीक्षक | बाजीराव त्रिबंक मोरे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह..क्र. ८९९९ | अनिल शांताराम देवकर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | म.पो.शि. क्र ११३४८० | रिना सर्जेराव जगताप | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र०८१७१२ | किशोर गुरूखेल | प्रशस्तीपत्रक |